REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 6 | MARCH - 2017

# भरतकालीन संगीतात वाद्यांचा प्रयोग

**प्रा. डॉ. मिनल ठाकरे**
संगीत विभाग प्रमुख , महात्मा ज्योतीबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**सारांश -**
आचार्य भरतकृत नाट्यशास्त्र ह्या ग्रंथात नाट्य व संगीत या विषयीची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. नाट्याच्या दृष्टीकोणातून संगीत हे केवळ मनोरंजनापुरतेच नाही तर नाट्यातील विविध पात्र, त्यांच्या प्रवृत्ती, प्रकृती, चित्तवृत्ती तसेच अवस्था यांचे सूचक असून नाटकातील विविध प्रसंगाच्या प्रभावी सादरीकरणाकरीता संगीत हे उपयुक्त ठरते. या करीता चतुर्विध वाद्यांचा प्रयोग व मुख्यतः वीणा, वंशी तसेच मृदंग या वाद्यांची उपयोगिता सिध्द झाली आहे. भरतकालीन संगीतात शास्त्रीय दृष्ट्या श्रुती, ग्राम, मुर्च्छना, जातिमान या संदर्भातही वाद्यांचा उपयोग महत्वपूर्ण ठरला आहे.

**प्रस्तावना -**

भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेले भारतीय संगीत हे गायन वादन व नृत्य ह्या तीनही कलांचा सेगम आहे. या तीनही कलांचा आधार ग्रंथ भरत मुनि कृत नाट्यशास्त्र हा मानला आहे. संगीत आणि साहित्य या संदर्भातील अतिशय महत्वपुर्ण माहिती या ग्रंथाद्वारे प्राप्त होते. भारतीयांच्या दृष्टीकोनातून भरत मुनिंचे नाट्यशास्त्र नाट्यवेद



म्हणून सन्मानित केले गेले आहे . नाट्यशास्त्राला 'पंचम वेद' असे ही संबोधिले आहे.

नाट्यशास्त्र या गंथाअंतर्गत नाट्य तसेच गांर्धव असे दोहोंचे संपूर्ण विवरण दिले आहे. नाट्यशास्त्रानूसार नाट्यकला ही अनादिसिध्द व ब्रम्होक्त मानली आहे. नाट्याकरीता तौर्यत्रिक या समानार्थी शब्दाचा प्रयोग आदिभरत काळात केलेला दिसतो. तौर्यत्रिक हा वाद्यबोधक शब्द असून तूर्य ह्या शब्दापासून तयार झालेला आहे. भरतमुनींनी तौर्यात्रिक हे नाटयाचे महत्वाचे अंग मानले आहे. त्यानुसार नाट्य हे चतुर्विध वाद्यांच्या सशास्त्र प्रयोगाने युक्त असावे. अभिनय हा रसभावान्वित असल्यामुळे वाघांच्या प्रयोगाला नाटयामध्ये महत्वाचे स्थान भरतमुनींनी दिले आहे. भरत कालीन संगीत हे केवळ गीताशीच संबंधीत होते मात्र गांधर्व मुख्यतः गीत व अनुषंगीक वाद्यवादनाची कला आहे असा उल्लेख आढळतो. भरतकालिन संगीतात जाति व जातिराग या परंपरा प्रचिलत होत्या. याकरिता मृदंग यासारख्या वाद्याचा प्रयोग तसेच कुतपविण्यास अथवा वाद्यवृंदनियोजना संबंधी ग्रामराग व मुर्च्छनांचा उल्लेख आढळतो. नाटय प्रयोगाअंतर्गत नाटय हे प्रभावशाली होण्याकरिता वाद्यवृन्दांचा यथायोग्य सादररीकरण होत असे. विशिष्ट रसनिष्पत्ती करीता वाद्यवृंदानाअंतरर्गत विशिष्ट स्वरांचा प्रयोग झालेला दिसतो.

**भरतकालीन नाटय, नाटयसंगीत व वाद्य -**

भरतमुनि कृत नाटयशास्त्र या ग्रंथात भारतातील प्राचीन नाटयकला या विषया संबंधी संपूर्ण माहिती आढळते. नाटयकलेशी निगडीत प्रत्येक अंगावर या ग्रंथात प्रकाश टाकला आहे. रस, छंद, भाषा वेशभूषा, रंगमंच अभिनय याबरोबरच संगीत व नृत्य या कलांचे देखील सखोल ज्ञान या ग्रंथामधून प्राप्त होते. भरतकालीन नाटयामध्ये संगीताला अत्यंत महत्वाचे स्थान होते. गीत किंवा गायनाबरोबरच निरनिराळया वाद्यांचा समावेश असायचा. संगीत व नृत्यावर आधारीत रूपक प्रकारांमध्ये वाद्यांचा प्रयोग निनादाने गायली जातअसे. तसेच नाटयामधील भावात्मक प्रसंगी गीत व वाद्यांचा यथायोग्य प्रयोग नाटय प्रभावी होण्याकरिता झालेला आहे. गीताची संगत म्हणून तबला किंवा तत्सम केवळ अवनंध्द वाद्यांचा प्रयोगच नाही तर वेणू व वीणा या वाद्यांना महत्वाचे स्थान होते. या वाद्यांचा प्रयोग रसानुकुल व लयानुकुल पध्दतीने केल जात असे. म्हणूनच वाद्य वादकांना वादनाबरोबरच

नाटयसंगीतात वाद्यवादनाला महत्वाचे स्थान होते. नाटयशास्त्रानुसार नाटयाकरिता वाद्यवृंदाचे योग्य संयोजन ही नाटकाच्या सफलेकरिता एक अत्यंत महत्वाची बाब होती. वाद्यवृंदालाच आतोद्यविन्यास किंवा कुतप ही सज्ञा दिली आहे. नाट्यगृहाच्या रचनेमध्येदेखील वाद्यवृंद व व गायकवृंदाच्या सुविधेकडे विशेष लक्ष दिले आहे. वादकांच्या दृष्टीने ध्वनि-प्रक्षेपण तसेच नाटयगृह तयार करते वेळी ध्वनी विज्ञानाची काळजी घेतली जात असे. कुतप हे नाटयाच्या पूर्वरंगाकरिता अत्यंत महत्वाचे मानले आहे. नाटकाच्या विषयाला अनुकुल असा तंत्री वाद्यांचा प्रयोग हा नाटयाच्या पूर्वरंगाचा महत्वाचा भाग समजला गेला. पूर्वरंगातील संगीत संयोजन हे पुढील नाटयवस्तुच्या स्वरूपाचे आकलन होणारे असावे. नाटयाच्या मंचावर शंख दुदुभी, मृदंग, पणव इ. वाद्यांचे वाद न झाले पाहिजे असे नाटयशास्त्रात सांगितले आहे. तसेच रंगदेवतेच्या पूजनाच्या वेळी शंख दुदुभी, मृदंग पणव या वाद्यांचा ध्वनी मंगलमय मानल आहे. नाटयाकरिता संगीत नियोजनामध्ये वाद्य तसेच गीतासंबंधी ज्या क्रिया केल्या जात त्यास बहिर्गीत किंवा निर्गित असे म्हटले जात. त्या अंतर्गत बहिर्गतातील नवविध अंगामध्ये आश्रावणा नामक क्रियेमध्ये वाद्यांच्या सुनियोजित वादनांतून प्रेक्षकांचे मनोरंजन करणे होय. वक्त्रपाणी नामक क्रियेअंतर्गत वीणेचे विविध लयींतून वादन व परिघट्टना क्रिये अंतर्गत तांत्री वाद्यांचा प्रयोग व या वाद्यांच्या कर्णणातून विविध स्वरांलींचे वादन होत असे. गायन क्रियेतील अलंकरांप्रमाणेच वीणेवर विस्तार, व्यंजन, आविध्द व करण या धातूचे अर्थात अलंकार वाजविले जात यामुळे वीणा वादन हे अधिक प्रभावशाली होत असे. याकरिता चित्रा या वीणेचा प्रयोग केलेला दिसतो. चित्रा वीणेचे वादन हे प्रसंगी दोन्ही हातांच्या बोटांचा प्रयोग करून होत असे ज्यामुळे प्रसंगी वैचित्र्य व ललीत्य निर्माण होत होता. नाटयामध्ये संगीत संयोजनात विविध वाद्यांचा प्रयोग हा वेगवेगळया प्रकारे झालेला दिसतो गीत गायना करिता ताल वाद्यंच्या प्रयोगा बरोबरच वीणा प्रकारांतील चित्रा वीणेचा उपयोग तत्व अनुगत व क्रोध या तीन प्रकारांतील लयीच्या अनुषंगाने अर्थात विलंबित, मध्य व द्रूत लयीतील गायनाकरिता केला आहे. भरतकालीन गीत गायन हे आधुनिक काळातील ख्याल गायनाप्रमाणे प्रारंभी विलंबित लय व शेवटी दूत वीणा या वाद्याचा प्रामुख्याने उपयोग झालेला दिसतो. वीणा हे प्रमुख वाद्य मानले होते.

नाटयसंगीतात किंवा नाटयांतर्गत चतुर्विध वाद्यांचा प्रयोग हा विशिष्ट भाव तसेच रसनिर्मिती होण्याकरिता झालेला दिसतो. विशिष्ट मनोभाव अभिव्यक्त होताना त्यानुसार वाद्यवादन केले जात असे गीता बरोबरच विभिन्न प्रकारच्या वाद्यांच्या प्रयोगाला नाटयकलेध्ये महत्वाचे स्थान होते.

### जाति आणि जातिराग व वाद्य ( मृदंग ) -

नाटयाशास्त्रामध्ये गानक्रियेअंतर्गत जाति हा प्रकार आढळतो.

नाटयशास्त्रामध्ये गानक्रियेअंतर्गत जाति हा प्रकार आढळतो. भरतकालीन संगीतात परंपरगत स्वरावली किंवा धून तसेच स्वरांचा वर्गीकृत समूह हा जाति संबोधिल्या जात होय. जातिनियमांचे उल्लंघन झाल्यास जातिराग निर्माण झालेले दिसतात. विशिष्ट जातिरागाकरीता मृदंगवाद्य श्रेष्ठ मानले आहे. तसेच मृदंग वाद्याची साथ उचित मानली आहे. नाटयशास्त्रानुसार मृदंगाची योग्य साथ संगत ही त्यावर वाजविले जाणारे स्पष्ट बोल, स्पष्ट प्रहार वादनातील चमत्कृती हे जातिरागातील माधुर्य व सौदर्य वृध्दींगत होण्यास पूरक ठरते.

### ग्रामराग, मुर्च्छना व वाद्य ( मृदंग ) -

भरतकालीन वाद्यवृंद नियोजनात मृदंग वादाला ग्रामराग व मुच्छनांचे ज्ञान असणे आवश्यक होते ज्यामुळे अनुकुल असे मृदंग वादन होणे शक्य होई. ग्रामराग मृर्च्छना गाणा-या गायकांची योग्य अशी संगत या गायनाक्रियांना अनुसरून मृदंगवादक करित असत. मृदंगावादन करित असतांना कनिष्ठिका अंगुलीचा प्रयोग केला जाई. जेणेकरून मूर्च्छनांनुसार मृदंगावर बोल वाजिवले जाणे शक्य होत.

### श्रुती व्यवस्था व वीणा वाद्य -

भरतमुनिकृत नाटयशास्त्रानुसार स्वरांची शुध्दस्थिती ही अंतिम श्रुतीवर सिध्द होत होती. भरतकालीन संगीतात श्रुती व्यवस्था स्पष्ट करण्याकरिता वीणा या वाद्याचा यथायोग्य प्रयोग केला आहे. वीणेच्या माध्यामातून भरतमुनिंनी षड्ज व मध्यम ग्रमामध्ये स्वरांच्या २२ श्रुतींचे अंतर स्पष्ट केले. सप्तकातील सात स्वरांत २२ श्रुती सिध्द करण्यामध्ये वीणा या वाद्याचे महत्वपूर्ण स्थान आहे. आचार्य भरतांनी शशिरी वीणा (कंठ) व दारवी वीणा ( काष्ठविणा) अल्प वीणा वाद्याचा उल्लेख केला आहे. कंठाव्दारे स्पतकातील २२ क्रमशः श्रुतींचा प्रयोग अत्यंत कठीण आहे परंतु वीणेच्या आधारे २२ श्रुतींची स्थापना करणे सहज शक्य व वीणेच्या तारा हा दृष्य स्वरूपात असल्याने समजण्यास सहाय्यक ठरल्या. यापुढे मध्यकालीन व आधुनिक पंडीतांनी देखील वीणा वाद्याच्या आधारेच श्रुती व्यवस्थेवर विस्तृत चर्चा केली आहे.

### भरतकालीन वाद्यवृंद -

भरतकालीन वाद्यवृंदाला कुतप ही संज्ञा होती. भरतकालीन संगीतात गायनाबरोबरच वाद्यवादनाला देखील महत्वाचे स्थान होते. अनेक प्रकारच्या वाद्यांचा प्रयोग कुतप अंतर्गत झालेला दिसतो. नाटयांतर्गत कुपत हे ततकुलप, अवनध्द कुतप व नाटय कुतप व नाटय कुतप असे त्रिविध विभाजन आढळून येते. वाद्यवृंदाकरिता रंगभूमीवर विशिष्ट रचना केली असून त्याचा यथायोग्य प्रयोग नाटय प्रभावी करण्याकरिता होत असे. गायकांच्या साथीकरिता तंत्रीवाद्य व सुणिर वाद्यांचा प्रयोग केला आहे. या संदर्भात वैपंचीक वैणिक व सुणिर वाद्यांअतर्गत वंशवादक असा उल्लेख केलेला दिसतो. वीणा व वेणू या वाद्यांना महत्वाते स्थान होते. काही विशाल अशा वाद्यवृंदामध्ये वंश या वाद्याला अंगभूत मानून शंख व डाक्किनी या सारख्या सुणिर वाद्य प्रकारांना प्रत्यंग मानले जात. वंशीवादकाला गीत, लय, माधुर्य संगीता संबंधी ज्ञान असणे आवश्यक होते. गायकाच्या गायकीतील स्वरावलींचे अनुकरण वंशीवादन करित असे. अवनध्द कुतप अंतर्गत मार्दगिक पाणविक तसेच दार्दुरिक या प्रमाणे चेर्मवाद्य वादकांचा समावेश होता. वाद्यवृंदाचे स्थान हे रंगभूमीवर प्रेक्षकांच्या सम्मुख होते. भरतकालीन संगीताशी संबंधीत प्रत्येक बाबींमध्ये वाद्यांचा प्रयोग झालेला दिसतो.

### वाद्याव्दारे रसिनिष्पत्ती -

आचार्य भरतांच्या मतानुसार जातिगान व वाद्यानांअंतर्गत सप्तकातील काही स्वर रसनिष्पत्ती करिता अनुकुल मानले आहेत. मध्यम व पंचम स्वरांचे प्राबल्य हे हास्य व श्रृंगार रसाचे उत्पतीत कारणीभूत ठरतात. वादनातील नडज व रिजभ वीर, रौद्र रसाची निर्मिती करतात तर धैवताचे प्राबल्य हे बीभप्स व भयानक रस उत्पत्तीस प्रेरक सिध्द होतात. या स्वरांतून रसनिष्पत्ती होण्याकरीता वाद्य वादन हे नियमानुसार होणे आवश्यक आहे. अन्यथा अपेक्षित रस निर्माण होऊ शकत नाही. कारण व्यक्तीगत स्वरातून जी रस निर्मिती होते तीच दोन, तीन स्वरांच्या समुहातून होईल हे निश्चित नाही. तेव्हा संगीत संयोजकाल नाट्यसंगीताकरीता न्याय्याचा रस, प्रसंग यानुसारच वाद्याची निवड करून रसोत्पत्तीला अनुकूल अशा नियमानुसार वादनाची योजना केल्यास योग्य रसनिष्पत्ती होऊन उत्तम कलाकृती निर्माण होऊ शकते.

वेगवेगळ्या वाद्य प्रकारांच्या एकत्रित प्रयोगाने देखील विशिष्ट रसनिष्पत्ती केली जाते. युध्द प्रसंगी वीर रस निर्मिती करीता मृदंग, भेरी, पटह, पणव, दर्दुर यासारख्या अबनध्द वाद्यांचा ध्वनी सहाय्यभूत ठरतो. धन वाद्यांतर्गत कांस्य, करताल, झांझ, मंजिरा या धातूनिर्मित वाद्यांचा यथोचित प्रयोग बरतकालीन संगीतात झालेला दिसतो.

अशा प्रकारे भरतकालीन संगीतात गायनाबरोबरच वाद्यांना तसेच वाद्यवादनाला महत्वाचे स्थान आहे. आचार्य भरताने नाट्यसंगीतात व इतरही गान प्रकारांमध्ये अनुकूल वाद्यांचा प्रयोग करून त्यांची उपयोगिता सिध्द केली.

### निष्कर्ष -

१) आचार्य़ भरताने नाट्यकलेकरीता उपयुक्त अशा संगीतात भावाभिव्यक्ती व रसनिष्पत्ती करीता गीताबरोबरच वाद्यांचा यथायोग्य प्रयोग करून केवळ शब्दाव्दांरेच नाही तर वाद्यांच्या शब्दरहीत स्वरावलीतून प्रभावी अशी रस निष्पत्ती होते हे सिध्द केले आहे. तसेच विशिष्ट मनोभाव व्यक्त करण्याकरीता तद्अनुकूल वाद्य संगीत सहाय्यभूत ठरते.

२) शास्त्रीय सिध्दांत स्पष्ट करण्याकरीता तंत्री वाद्यांतील वीणा हे वाद्य महत्वपूर्ण सिध्द झालेले आहे. यामुळे मध्यकालीन व आधुनिक शास्त्रीय प्रयोगांना चालना मिळाली आहे.

### संदर्भ ग्रंथ -

१) शास्त्रीय संगीताचा इतिहास - डॉ. शरदचंद्र श्रीधर परांजपे, चौखंबा विद्याभवन वाराणसी.

२) संगीत सुधा - लावण्य किर्तिसींह (काव्या), कनिष्क पब्लिकेशन, डीस्ट्रीब्युटर्स नई दिल्ली.

३) उत्तर भारत संगीत में तंत्रीवाद्यो का स्थान एवमं उपयोगीता - डॉ. संगीता सिंह , कनिष्क पब्लिकेशन, डीस्ट्रीब्युटर्स नई दिल्ली.

४) संगीत विशारद - वसंत, संगीत कार्यालय हाथरस.